पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ५
सभावृत्तांत

दिनांक - ३/०८/२०१६ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०३/०८/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे – सभापती**
२. मा.मंदा उत्तम आल्हाट
३. मा.नितीन प्रताप काळजे
४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
६. मा.सुनिता (माई) पांडूरंग गवळी
७. मा.सुपे आशा रविंद्र
८. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
९. मा.अजित दामोदर गव्हाणे
१०. मा.गोफणे अनुराधा देविदास
११. मा.जालिंदर (बाप्पु)शिंदे,
१२. मा.सौ.सुरेखा शंकर गव्हाणे
१३. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१४. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
१५.मा.आहेर संजय निवृत्ती- स्विकृत सदस्य
१६.मा.सोमवंशी प्रकाश बबनराव - स्विकृत सदस्य
१७.मा. विजय सुदाम रसाळ

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.चंद्रकांत इंदलकर- क्षेत्रीय अधिकारी, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.श्री.जीवन गायकवाड, कार्य अभियंता (स्थापत्य), मा.श्री.थोरात– कार्य अभियंता, (विद्युत)), मा.श्री.जयंत बरशेट्टी कार्य. अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.कोंडे के.बी. उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.संजय घुबे - उप अभियंता, मा.श्री.वाघमारे एस.बी.-उप-अभियंता (स्थापत्य), मा.श्री.लांडे बी.पी -उपअभियंता (विद्युत), मा.श्री.मनोज सेठीया-उपअभियंता(जनि),मा.श्री.व्ही.सी.काळे-उपअभियंता(स्थापत्य), मा. श्री. डी. एच. बोरावके उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.जाधव व्ही.के. उपअभियंता (स्थापत्य उद्यान). मा.श्री.वाडकर एस.व्ही. क.अभियंता(स्थापत्य), मा.श्री.निखील फेंडर क.अभियंता (स्थापत्य उद्यान), मा.श्री.दिग्विजय पवार - क.अभियंता (पाणीपुरवठा), मा. श्री.इप्पकायल एस. एच.लेखाधिकारी, मा.श्री.दाते टी.एच. - सहा. आरोग्य अधिकारी, मा.श्री.जे.एन.खैरे- (सहा.उद्याननिरीक्षक), मा.श्री.देशमाने पी.एच.-कार्या.अधिक्षक, मा.श्री.एस.डब्ल्यू- मुख्याध्यापक, मा.वि., लांडेवाडी शाळा, मा.श्री.माळी एस.के. आरोग्य निरीक्षक,

पशुवैद्यकिय, मा.श्री.नाडेकर बी.के.सहा. शिक्षक, मा.श्रीम. प्रभावती पाटील – पर्यवेक्षक-शिक्षण मंडळ, मा.श्री.डामसे आर.- मलेरिया निरीक्षक,

-----

**मा.सभापती**- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

-------

**विषय क्रमांक १.** तरतूद वर्ग करणेबाबत. अतिक्रमण विभागातील पत्र क्र. इअति /१/कावि/१५२/२०१६, दिनांक २८/७/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक २.** पादचारी पुलास नाव देण्याबाबत मा.आमदार श्री.महेश किसनराव लांडगे यांचे क्र. ८७०७ दिनांक ३०/७/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक ३.** प्रभाग क्र.३३ गवळीनगर हगणदारी मुक्त घोषीत करणे बाबत. आरोग्य विभागाकडील पत्र क्र. इक्षेआ/०२/कावि/६३८/२०१६ दि.२९/७/१६चे पत्र.

**विषय क्रमांक ४.** नामफलक लावण्याबाबत. सन्मा.सदस्य मंदाताई आल्हाट यांचे दि. ३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक ५.** नामफलक लावण्याबाबत. सन्मा.सदस्य मंदाताई आल्हाट यांचे दि. ३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक ६.** प्रभाग क्र.३२ मधील गंगोत्री उद्यानातील गजबो बांधकाम काढणेस मंजूरी मिळणेबाबत. सन्मा सदस्य श्री.अजित दामोदर गव्हाणे यांचे दिनांक ३/०८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक ७.** चौकाचे नामकरण होणेबाबत सन्मा.स्विकृत सदस्य श्री.प्रकाश सोमवंशी यांचे दिनांक ३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक ८.** प्रभाग क्र. ३० चक्रपाणी वसाहत येथील उड्डाणपुलाखालील बांधकाम पोलीस चौकीला देणेबाबत.सन्मा.सदस्य श्री.वसंत (नाना) आनंदाराव लोंढे यांचे दिनांक ३/८/२०१६ चे पत्र.

अ) दिनांक ७/७/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ०४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक- ११ विषय क्रमांक- १

दिनांक- ३/८/२०१६

सूचक- मा.सुनिता (माई) गवळी अनुमोदक- मा.सुरेखा गव्हाणे

संदर्भ - अतिक्रमण विभागातील पत्र क्र. इअति /१/कावि/१५२/२०१६, दिनांक२८/७/२०१६ चे पत्र.

इ क्षेत्रीय कार्यालय अतिक्रमण विभागाकडील अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर सन २०१६-१७ करीता तरतूद र.रु.५०,०००/-करणेत आली होती. दिनांक २/७/२०१६ अखेर र.रु. ३२,०००/- इतका खर्च झालेला आहे व उर्वरित शिल्लक र.रु. १८,०००- इतकी असुन सद्यस्थिती पाहता ती कमी आहे. इ क्षेत्रीय कार्यालय अतिक्रमण विभागाकडील सन

२०१६-१७ चे रजा प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर तरतुद र.रु. १,००,०००/- इतकी आहे. त्यामधून दि.१३/०६/२०१६ अखेर र.रु.१४,०००/- असा खर्च झालेला आहे व उर्वरित शिल्लक र.रु.८६,०००/- इतकी आहे. त्या रकमेमधून र.रु.५०,०००/- इतकी रक्कम अतिक्रमण अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर वर्ग करणे आवश्यक आहे. तरी इ क्षेत्रीय कार्यालय अतिक्रमण विभागाकडील अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर सन २०१६-१७ करीता तरतूद र.रु. ५०,०००- इतकी आहे. दि.२/७/२०१६ पर्यंत सदर लेखाशिर्षावर र.रु.३२,०००/- खर्च झालेला आहे व उर्वरित र.रु.१८,०००/- इतकी शिल्लक आहे. सद्यस्थितीत पुढील कालावधीसाठी सदरची रक्कम कमी असलेने इ अतिक्रमण विभागाकडील रजा प्रवास भत्ता या लेखाशिर्षावरील तरतुद र.रु.१,००,०००/- मधून र.रु.५०,०००/- इतकी वर्ग करणेकामी मा.प्रभाग समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- १२ विषय क्रमांक- २

दिनांक- ३/८/२०१६

सूचक- मा.सुरेखा शंकर गव्हाणे अनुमोदक- मा.सुनिता(माई) गवळी

संदर्भ- मा.आमदार श्री.महेश किसनराव लांडगे यांचे दिनांक ३०/७/२०१६ चे पत्र

भोसरी शहरामध्ये गव्हाणे वस्ती, शितल बाग येथे नागरीकांच्या मागणीनुसार अद्यावत पादचारी पुल उभा राहात असून सदरच्या पुलास भोसरी मधील जुन्या पिढीतील धार्मिक क्षेत्रातील ह.भ.प.वैकुंठवासी गुरुवर्य भोसरीकर माऊली तथा ज्ञानोबा भिमाजी लोंढे पादचारी पुल असे नांव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- १३ विषय क्रमांक- ३

दिनांक- ३/८/२०१६

सूचक- मा.वसंतराव (नाना) लोंढे अनुमोदक- मा.विश्वनाथ लांडे

संदर्भ - प्रभाग क्र.३३ गवळीनगर हगणदारी मुक्त घोषीत करणे बाबत. आरोग्य विभागाकडील पत्र क्र. इक्षेआ/०२/कावि/६३८/२०१६ दि.२९/७/१६चे पत्र.

केंद्रशासनाने देशातील सर्व शहरांमधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणेचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासून स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/२०१५/प्रक२४/नवी/३४, दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६ दि.०१/०४/२०१६ अन्वये दि.२/१०/२०१७ पुर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने इ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ३३ गवळीनगर हा प्रभाग दि.३१/८/२०१६ पुर्वी हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- १४ विषय क्रमांक- ४

दिनांक- ३/८/२०१६

सूचक- मा.मंदाताई आल्हाट अनुमोदक- मा.सुरेखाताई गव्हाणे

संदर्भ - नामफलक लावण्याबाबत. सन्मा.सदस्य मंदाताई आल्हाट यांचे
दि. ३/८/२०१६ चे पत्र.

बनकर वस्ती येथे नाशिक हायवेलगत नागरीकांना माहितीसाठी पहिल्यापासून बनकरवस्ती हे नामफलक आहे, परंतु पुर्व बनकर वस्ती व पश्चिम बनकरवस्ती नाव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- १५ विषय क्रमांक- ५

दिनांक- ३/८/२०१६

सूचक- मा. मा.मंदाताई आल्हाट अनुमोदक- मा.सुरेखाताई गव्हाणे

संदर्भ - नामफलक लावण्याबाबत. सन्मा.सदस्य मंदाताई आल्हाट यांचे
दि. ३/८/२०१६ चे पत्र.

बनकर वस्ती मोशी येथे जवळजवळ ४०० वर्षापासून पुरातन काळातील भैरवनाथ मंदीर आहे. दरवर्षी मोशी गावातून दस-याला या भैरवनाथ मंदीरामध्ये भैरवनाथची पालखी येते. सर्व ग्रामस्थ व रहिवासी येथे येतात. व शिलंगणाला येतात. २००४-२००५ मध्ये जिर्णोध्दार झाला आहे. त्या मंदीरासमोरुन १८ मी.डी.पी. रस्ता गेला आहे. त्या रस्त्यास भैरवनाथ मंदीर मार्ग/चौक असे नांव देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- १६ विषय क्रमांक- ६

दिनांक- ३/८/२०१६

सूचक- मा.अजित गव्हाणे अनुमोदक- मा.आशा सुपे

संदर्भ - प्रभाग क्र.३२ मधील गंगोत्री उद्यानातील गजबो बांधकाम काढणेस मंजूरी मिळणेबाबत
सन्मा सदस्य श्री.अजित दामोदर गव्हाणे यांचे दि.३/०८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.३२ मधील गंगोत्री पार्क उद्यानामध्ये बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम करण्याची निविदा काढण्यात आलेली आहे. सदर इमारतीचे बांधकाम चालू करणेसाठी त्या ठिकाणी असलेले जुने गजबो बांधकाम काढणे आवश्यक आहे. सदर बांधकाम काढणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- १७ विषय क्रमांक- ७

दिनांक- ३/८/२०१६

सूचक- मा.प्रकाश सोमवंशी, स्विकृत सदस्य अनुमोदक- मा.विश्वनाथ लांडे

संदर्भ - चौकाचे नामकरण होणेबाबत सन्मा.स्विकृत सदस्य श्री.प्रकाश सोमवंशी यांचे दिनांक ३/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.२९ इंद्रायणीनगर, भोसरी येथील वैष्णोमाता चौक ते संतनगर चौक या दरम्यानच्या रस्त्यामध्ये द्वारका प्लॅटीनम व द्वारका विश्व या सोसायटयांमधील चौकास **"द्वारका चौक"** असे नामकरण देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- १८ विषय क्रमांक- ८

दिनांक- ३/८/२०१६

सूचक- मा.श्रध्दा लांडे अनुमोदक-मा.Adv.नितीन लांडगे

संदर्भ - प्रभाग क्र. ३० चक्रपाणी वसाहत येथील उड्डाणपुलाखालील बांधकाम पोलीस चौकीला देणेबाबत.सन्मा.सदस्य श्री.वसंत (नाना) आनंदाराव लोंढे यांचे दिनांक ३/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ३० चक्रपाणी वसाहत येथील भोसरी येथे जिजामाता उड्डाणपुलाजवळ पुर्वी पोलीस चौकी होती. सदर पोलीस चौकी रस्ता रुंदीकरणामध्ये पाडली गेली सदर पोलीस चौकीला जिजामाता उड्डाणपुलाखाली गवळी कमान समोरील ६१ चौ.मी.क्षेत्रफळ असलेले बांधकाम आवश्यक ते बदल करुन पोलीस चौकीला देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

सही/-
डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे
सभापती
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/५४१/२०१६
दिनांक- २६/०८/२०१६

**सही / -**
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय,
भोसरी – ३९

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दि.३/८/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.नितीन काळजे –** आरोग्य विभागाकडील हागणदारी मुक्त गांव करणे याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – केंद्र शासनाच्या माध्यमातून स्वच्छ भारत अभियान योजना राबविण्यात येत आहे. या अभियान अंतर्गत पुर्ण शहर हे हागणदारी मुक्त करण्याचे धोरण शासनाने निश्चित केले आहे. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग हागणदारी मुक्त करण्यासाठी वॉर्ड क्र. ३२,३४, आपण निश्चीत केले आहे. त्यामध्ये काही निकष आहे. शासनाची टीम या ठिकाणी पाहणी करण्यासाठी येणार आहे. आपण सगळे वॉर्ड हागणदारी मुक्त करणार आहे. शासनाने हे कळविल्यानुसार प्रभाग समितीची ही मान्यता घेणे आवश्यक आहे. आपल्याला मान्यता मिळाल्यानंतर हा वॉर्ड निश्चीत करण्यात येईल.

**मा.नितीन काळजे –** यामध्ये काय कामे येतात? शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी अर्ज दिले त्याबाबत आपण काय काम करीत आहात? माझे वॉर्डमधून ४०० अर्ज दिले होते. बरेचसे अर्ज बाद झाले आहे. ३० टक्के अर्ज चुकीचे आहे. काही लोकांनाच अनुदान दिलेले नाही. ग्रामीण भागातील लोक इकडे येऊ शकत नाही.किती तरी अर्ज पेंडींग आहेत. वि भागाकडून जास्त सर्व्हे करीत नाही. सर्वांत जास्त अर्ज माझे वॉर्डमधील आहे. सहा सहा महि ने सर्व्हे करीत नाही. आम्हाला ब-याच गोष्टीचा त्रास होत आहे.

मा.क्षेत्रीय अधि कारी – आपल्याला पुर्ण टार्गेट करायचे आहे.

**मा.नितीन काळजे –** ज्यांचे शौचालयाचे बांधकाम केले नाही त्यांचे पैसे काढून घ्या. तुम्ही पैसे दिल्या शिवाय ते लोक बांधकाम करु शकत नाही. आमचे गांव कसे हगणदारी मुक्त होणार ?

**मा.तानाजी दाते (सहा.आरोग्याधिकारी)** – शासनाकडून सोळा हजार देण्यात येते. आठ हजार दिल्यानंतर त्यांनी ड्रेनेज जोडून घेऊन सर्व काम करायचे आहे. बांधकाम पुर्ण झाल्यानंतर अपलोड करण्यात येते. दुस-या हस्याची प्रोसीजर केली जाते.

**मा.नितीन काळजे –** माझे वॉर्डमधील अर्ज आणून देतो. शौचालयाचे काम प्रॉपर झाले पाहिजे. पुढच्या महिन्या पर्यंत माझे वॉर्डमधील एकही माणसाचे शौचालयाचे काम राहिले नाही पाहिजे.

**मा.सुनिता (माई) गवळी** –माझे वॉर्डमध्ये रस्त्यावर डांबर व खडी वेगवेगळी झाली आहे.

**मा.विनया तापकीर –** माझे वॉर्डमधील समुहशिल्पाचे उद्घाटन दोन वर्षापुर्वी झाले आहे. तो प्रोजेक्ट कधी पुर्ण करणार आहे? ७० लाख रुपये तरतूद आहे. ते प्रोजेक्ट करायचे आहे का नाही? मला फायनल त्याबाबत सांगणे.

**मा.व्ही.सी.काळे (उपअभियंता, स्थापत्य)** – मा.आयुक्त साहेबांकडे फाईल आहे. आठ दिवसात टी.एस. होईल. त्यामध्ये करेक्शन करायचे आहे.

**मा.विनया तापकीर –** दोन वर्षापासून काम तसेच राहिले आहे. पुतळे कसे झाले आहेत याची माहिती नाही.

**मा.व्ही.सी.काळे (उपअभियंता, स्थापत्य)-** टोटल २५ मुर्त्या आहेत त्यापैकी २० मुर्त्या झाल्या आहेत. २९ लोक ते काम करीत आहेत. टी.एस.चे काम आहे.

**मा.विनया तापकीर –** माझे वॉर्डमधील डांबरीकरणाचे काम चालू केले नाही. ठेकेदार मतरानी यांनी काम करण्यास वेळ लावला आहे. आता या कामास तुम्हा वेळ लावू नका.

**मा.व्ही.सी.काळे (उपअभियंता, स्थापत्य)**- पाऊस पडल्यामुळे काम करता आले नाही.

**मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता, स्थापत्य) –** स्थापत्य विभागाकडून १२ कामाची निविदा काढणार आहे. ९ निविदा पब्लीश केल्या आहेत. ३ कामे करायची राहिली आहे. समुहशिल्पाचे काम करण्यात येईल. दोन मुख्य रस्ते आळंदी ४५ मीटरचा रस्ता व ३० मीटरचा रस्ता राहिला आहे. समुहशिल्पाच्या कामासाठी कन्सलटंट नेमले आहे. कन्सलटंट इस्टीमेंट देतील. आपण रस्त्याचे काम केलेले आहे. पाईप लाईनच्या मजबुतीकरण करणार आहे. रस्त्याच्या सेंटरला ९ मी. उंचीचे पोल करणार आहे. वायडींग करणार आहे. त्यासाठी प्रस्ताव मुख्य कार्यालयाकडे सादर केला आहे. समुह शिल्पाचे दोन भाग केलेले आहे. २५ मुर्त्यांसाठी चबुत-याचे काम करणार आहे. २५ मुर्त्यांपैकी १२ मुर्त्यांचे काम केलेले आहे. त्यासाठी मुख्य वास्तूविशारद, वारकारी पंथाचे

तज्ञ येणार आहेत. ते प्रत्येकजण निरीक्षण करुन सर्टीफिकेट देतील. मुख्य वास्तू विशारद त्या मुर्तीला अप्रोच देतात. फायबरच्या मुर्त्यांचे महाराष्ट्र शासनाकडे अहवालासाठी दिले जाते. त्यांचा अहवाल आल्यानंतर जिल्हाधीकारी कार्यालयाकडे दयायचे असते. त्या भागाचे निरीक्षण झाले नंतर नगरविकास खात्याकडे प्रकरण जाते. या क्षेत्रात आपले प्रयत्न चालू आहे. वैयक्तिक मुंबईला जावून पाटपुरावा करीत आहे. मुर्ती चबुत-यावर उभी करताना आपल्याला ट्रेलर घ्यावी लागते. या सर्व गोष्टी केल्यावर मुर्तीचे अनावरण करणार आहे. मुर्ती उभी करणार आहे. आता ते फायनल स्टेजला आहे.

**मा.विनया तापकीर –** माझे वॉर्डमध्ये व्हीजीट दया. रस्त्याची अवस्था बेकार आहे. अग्निशामकची गाडी बोलवून रस्ता धुतलेला आहे. सगळी टेल्कोची काळी मती आहे. चौकशी कशी होणार? कच-याची गाडी दोन तीन दिवसात फिरत नाही. गाडीवर तीन लोक कशाला असतात. एक तर नुसता बसुनच असतो. एक ड्रायव्हर असून वॉर्डमध्ये कच-याचे गाडीची कंप्लेट येते.

**मा.तानाजी दाते (सहा.आरोग्याधिकारी)-** कच-याची गाडी पंक्चर झाली तरच कंप्लेट येते.

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे – सभापती** – मागचे वेळेस पण नगरसेवकांनी कंप्लेट केली होती. वेळेच्या वेळी कामे केली पाहिजे. काही अडचणी असेल तर सांगा.

**मा.तानाजी दाते (सहा.आरोग्याधिकारी)-** प्रत्येक वॉर्डमध्ये मी फिरत असतो.

**मा.मंदाताई आल्हाट -** पाणंद रस्त्याच्या कामाबाबतची फाईलवर अजून सही झालेली नाही. सगळी कामे फास्ट केली पाहिजे. कोणत्याही कामाला वेळ नाही लागला पाहिजे**.** माझे वॉर्डातील कामे का थांबविली आहेत.

**मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता, स्थापत्य) –** टेंडर काढले आहे. वर्कऑर्डर पण दिलेल्या आहे. १७ कामाचे टेंडर काढलेले आहे. एकही काम बी ठेवलेले नाही. पावसाळा झाला की, रस्त्याची कामे चालू करता येतील.

**मा.विश्वनाथ लांडे –** गेले चार वर्षापासून माझे येथील कमानीचे काम चालू आहे. ५० टक्केच काम झाले आहे. त्या ठिकाणी तसेच मटेरियल पडून आहे. चार चार वर्षे काम होत नसेल तर उपयोग काय त्या कामाचा. याबाबत लवकर काही तरी निर्णय घ्या. गुळवेवस्तीची काय अवस्था आहे ते पाहणे.

**मा.नितीन काळजे** – च-होली येथील ४५ मीटर रस्त्याचे काम का थांबविले आहे? चार वर्षे झाली मी या विषयावर बोलत आहे. शेतक-यांचे नुकसान करीत आहात. शेतक-यांनी काही तरी त्या ठि काणी केले असते. शेतक-यांचा जो हिस्सा आहे तो सोडून दया. दोन वर्षापासून त्या ठि काणी मुरुम टाकलेला आहे. शेतक-यांबरोबर आम्ही वाईट झालो आहे. शेतकरी शेती करीत होते ते परवडले असते. दोन वर्षापासून पैसे अडकुन राहि ले आहे. या कामाबाबत मा.स्थायी समि ती सभेमध्ये ठरावास मान्यता दि लेली आहे. ठराव मंजूर झालेला आहे.

**मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता, स्थापत्य) –** दाभाडे यांनी कागदपत्र दिली आहेत. च-होलीत ४५ मीटर रस्ता करण्यासाठी टेंडर काढले आहे. दाभाडे यांची जागा रस्त्यामध्ये गेलेली आहे. त्यासाठी हे काम राहिलेले आहे. आरक्षण कॅन्सल करायचे होते. शासनाकडून मान्यता झाल्यानंतर सी.डी. वर्कचे काम रस्त्याचे काम करण्यात येईल. त्यामुळे हे काम अर्धवट आहे. शेतक-यांची भिंत बांधायचे काम चालू आहे.

**मा.नितीन काळजे –** त्या कामासाठी मी पैसे खर्च केले आहे. आम्ही भूसंपादन कडून त्या कामासाठी पैसे आणलेले आहे. आमचेकडील जुनी पाण्याची टाकी पाडून घ्या.

**मा.जयंत बरशेट्टी (कार्यकारी अभियंता पा.पु.) –** च-होली येथील पाण्याची टाकी पाडण्याचे काम करुन घेण्यात येईल. ऑगस्टमध्ये एक वेळ पाणीपुरवठा करण्याचा निर्णय होईल.

**मा.अजित गव्हाणे –** गव्हाणे वस्ती येथील पाण्याचे पंप चालत नाही. जुने पंप आहेत ते योग्य क्षमतेने चालत नाही नाही. ते काढून नवीन पंप बसविले पाहिजे.
कच-याची काय परिस्थिती ती पाहणे.

**मा.विनया तापकीर** – २० वर्षापासूनच्या ज्या जुन्या पाण्याच्या पाईप लाईन आहेत त्या पाहिल्या पाहिजे. त्यामधून पाण्याची गळती होत असेल तर पाईप लाईन बदलली पाहिजे.

**मा.जयंत बरशेट्टी (कार्यकारी अभियंता पा.पु.) -** ब-याच कामाची निविदा झालेली आहे. पाईप सुध्दा आलेले आहे. जुन्या पाण्याच्या पाईप लाईन आहेत त्या बदलण्यासाठी परवानगी घेण्यात येऊन ऑक्टोबर मध्ये जुन्या पाईप लाईन बंद करुन नवीन पाईप लाईन करणार आहे. जुन्या पाईप लाईन क्रॅक होतात. आमचेकडे जुने नकाशे आहेत.

**मा.अजित गव्हाणे –** घाण पाण्याच्या तक्रारी येत आहेत. पाणी पुरवठा विभागाने कधी सर्व्हे केला आहे का? पाण्याच्या टाकीची लेवल मेंटेन करा. वैयक्तीक पाणपुरावा केला पाहिजे.

**मा.जयंत बरशेट्टी (कार्यकारी अभियंता पा.पु.) -** पाणी पुरवठा विभागाकडून सर्व्हे करुन घेणार आहे.

**मा.वसंत (नाना) लोंढे -** इ क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, ड्रेनेज विभागाचे किती टेंडर झाले आहे याची माहिती दयावी.

**मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता, स्थापत्य) –** स्थापत्य विभागाकडील एकूण ७८ कामे होती. २६ कामाची निविदा उघडली आहे. ४२ कामासाठी रिसपॉन्स नव्हता. फेरनिविदा दिलेली आहे. तीन पेक्षा कमी आले आहे. मुदतवाढ दिलेली आहे. सगळीकडे कामे चालू आहेत.

**मा.जयंत बरशेट्टी (कार्यकारी अभियंता पा.पु.) –** पाणीपुरवठा विभागाची ५९ कामे काढलेली आहे. ७ कामासाठी ३ निविदा आलेली आहे. त्यासाठी मुदतवाढ दिलेली आहे. २४ कामांना अल्पप्रतिसाद असल्यामुळे मुदतवाढ दिलेली आहे. काही कामे अशी आहेत की त्या कामांची प्रोसेस चालू आहे. २८ कामांची मुदत संपणार आहे. सगळी कामे चालू आहेत.

**मा.अजित गव्हाणे –** प्रायव्हेट कामे लवकर होतात. आपली सरकारी कामे लवकर होत नाही. प्रत्येक ठिकाणी इंटरेस्ट आहे. कामे झाली पाहिजे.

**मा.वसंत (नाना) लोंढे –** विद्युत विभागाकडील कामे अगोदर केली पाहिजे.

**मा.लांडे (उपअभियंता विद्युत) –** विद्युत विभागाची ११७ कामे आहे. २२ कामांचे ओपनींग होणार आहे.

**मनोज सेठीया-उपअभियंता(जनि)** – ड्रेनेज विभागाची १७ कामे ओपन केली आहेत. ७ कामासाठी अल्प प्रतिसाद आहे.

**मा.वसंत (नाना) लोंढे** – सर्व कामांचे टेंडर भरा. सूचना दया. काही अडचणी असतील त्या पाहणे. सर्व टेंडर निघाले पाहिजे. १० टक्के पुढे नेल्यावर प्राब्लेम झालेला आहे. पुढच्या मिटींगपर्यंत सर्व टेंडर निघालेली पाहिजे.

**मा.जालिंदर शिंदे** – मा.स्थायी समिती सभेमध्ये नाला सफाई बाबत जे आदेश दिले आहेत त्याबद्दल काय कारवाई केली आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** कच-याच्या गाडया क्लीन करुन घ्याव्यात. इतर प्रभागाच्या मानाने आपल्या प्रभागाची परिस्थीती चांगली आहे. सर्व नाला सफाई करण्यात आलेली आहे.

**मा.प्रशासन अधिकारी –** प्रभाग समितीच्या वतीने मा.इंदलकर साहेब यांचा सहा.आयुक्त पदी नियुक्ती झालेमुळे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येत आहे.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.